ऐ मेरे दिले - नादाँ...

टॉवर हाऊस

पूर्वीच्या बी ग्रेड कृष्ण-धवल चित्रपटांचं एक वैशिष्ट्य असायचं. कसल्या तरी थातुरमातुर कथानकावर बेतलेल्या या चित्रपटांतील कलावंताचा अभिनयही सुमार वकुबाचा असे, पण प्रेक्षक मात्र शेवटची हाणामारी संपेपर्यंत जराही चुळबूळ न करता त्या सिनेमांचा आस्वाद घ्यायचे. कारण एकच! त्यातली गाणी. चरित्र अभिनेता एन. ए. अन्सारीने दिग्दर्शित केलेल्या 'टॉवर हाऊस' या 'रहस्यमय रोमांचकारी' चित्रपटाबद्दल आपल्याला नेमकं हेच म्हणता येईल. रसिकांनी या चित्रपटाला आवर्जून हजेरी लावली ती लताच्या या दर्दभऱ्या सुंदर सोलोसाठी. अर्थात त्यातलं 'मैं खुशनसीब हूँ...' हे लता/ मुकेशचं गाणंही तितकंच गोड होतं, पण ज्या काळात आमच्या कंपूने हा सिनेमा पाहिला होता त्यावेळी प्रत्येकाला प्रकर्षाने संगीतकार चित्रगुप्तची आठवण झाली होती. कारण इथे संगीतकार रवीने लताचं हे अजरामर गाणं दिलं खरं, पण इतर गाणी तेवढ्या ताकदीने देण्यात तो कमीच पडला. त्याऐवजी चित्रगुप्त असता तर सगळा 'टॉवर हाऊस' थेट 'गेस्ट हाऊस'सारखाच संगीतमय होऊन गेला असता. असो...

आता 'टॉवर हाऊस'ची कथा सांगायची तर मुळात टॉवर हाऊस म्हणजे नेमकं काय हे त...ला हवं. हा एक जुना पडिक मनो...सतो. कोणी तिकडे फिरकत नसे. कारण तिथं म्हणे भुतांचं वास्तव्य असतं. शिवाय या टॉवरवरून नायिका सविता (शकिला) हिच्या आईने उडी मारून आत्महत्या केल्याने तिचा अतृप्त आत्माही तिथे वास करीत असतो. सविता ही धनाढ्य मिल मालक सेठ दुर्गादासची (एस. एन. बॅनर्जी) एकुलती कन्या. आपली पत्नी शीलाने टॉवर हाऊसवरून आत्महत्या केल्याने सेठजींनी आईविना पोरक्या झालेल्या सविताला लाडात वाढवलेलं असतं. शिवाय ती ज्याच्यावर प्रेम करतेय त्या सुरेशलाही (अजीत) आपल्याच मिलमध्ये मोठ्या हुद्द्यावर रुजू करून घेतलेलं असतं.

पण या दिलदार शेठजींच्या संपर्कात रणजीत (एन. ए. अन्सारी) नावाचा एक खतरनाक खुनी येतो. चेहऱ्यावर सभ्यतेचा बुरखा पांघरून आणि गोड बोलून तो शेठजींचा विश्वास संपादन करतो. खरं तर या रणजीतने आफ्रिकेत असताना सविताच्या आजोबांना ठार मारलेलं असतं. कारण त्यांच्या...लेला हिऱ्या- माणकांचा गुप्त खजिना त्यांनी टॉवर हाऊसच्या तळघरात ठेवलेला असतो आणि त्याचा सुगावा रणजीतला लागल्यामुळे तो हस्तगत करण्यासाठीच रणजीत त्यांना मारून टाकतो.

सेठ दुर्गादासच्या सान्निध्यात येताच तो आपले कारनामे सुरू करतो. शिकारीला जंगलात गेलेल्या सविताला वाघाच्या तावडीतून वाचविताना रणजीत जबर जखमी होतो. त्याचा उजवा पाय आणि उजवा डोळा निकामी झाल्यामुळे तर शेठजी त्याच्यावर एवढे लुब्ध होतात की, आपल्या मिलचा सगळा कारभार त्याच्यावर सोपवून टाकतात. त्याच वेळी ते सविताचं लग्नही सुरेशबरोबर ठरवतात, पण दुष्ट रणजीत सविताचीही लालसा बाळगून असतो.





बॅनर : दीश प्रॉडक्शन्स : निर्माता : जे. सी. मल्होत्रा

दिग्द. एन. ए. अन्सारी. संगीत- रवी.

प्रदर्शन : शुक्र २१ सप्टें. १९६२ गीतकार : असद भोपाली, एस. एच. बिहारी.

कलाकार : अजीत, शकीला, एन. ए. अन्सारी, भगवान, एस. एन. बॅनर्जी, निलोफर, प्रतिमादेवी इतर.

गाणी :

१) ऐ मेरे दिले नादाँ- तू गम से न घबराना : गायक- लता- गीतकार- भोपाली.

२) जरा बचके शिकारी शिकार करना... आशा- एस. एच. बिहारी

३) मैं खुशनसीब हूँ, मुझको किसी का प्यार मिला- मुकेश/ लता भोपाली, -

४) मौसम है जवाँ नूर में डुबे हैं नजारे... आशा- भोपाली

सगळा कारभार हाती येताच मग तो आपली सेक्रेटरी फ्लॉरेन्स (निलोफर) हिच्या मदतीने सुरेशला बदनाम करून शेठजींकडून त्याची हकालपट्टी करण्याचं कारस्थान खेळतो. सुरेशचा अडथळा दूर झाल्यावर रणजीतला मोकळं रान मिळतं, पण त्याच दरम्यान शेठजींना अचानक आपल्या मृत पत्नीचं एक जुनं पत्र मिळतं. त्यात तिने रणजीतची खरी ओळख नमूद केलेली असते आणि त्यापासून सावध राहण्याचा इशारा दिलेला असतो. एकाकी पडलेल्या शेठजींना आपली चूक उमगते आणि मदतीसाठी ते पुन्हा सुरेशला बोलावतात. सुरेशही धावून येतो, पण त्यापूर्वीच रणजीत शेठजींचा खून करून त्याचा आरोप सुरेशवर ठेवतो. आता सुरेशच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागतो, म्हणून तो परागंदा होतो.

इकडे एकाकी पडलेल्या सवितालाही रणजीत वेडी ठरवून तिची रवानगी पडक्या टॉवर हाऊसमध्ये करतो. नेमकी तिथेच सविताला तिची आई भेटते. कारण तीही जिवंत असते आणि रणजीतनेच तिला खजिन्याच्या शोधार्थ बंदिस्त करून ठेवलेलं असतं. दरम्यान, सुरेशलाही रणजीतच्या दुष्ट कारवायांचा पत्ता लागतो आणि वेषांतर करून तो त्या टॉवर हाऊसमध्ये शिरून रणजीतच्या टोळीचा बीमोड करून त्यालाही यमसदनास पाठवतो आणि आपल्या प्रेयसीची नि पर्यायाने तिच्या आईचीही सुटका करतो.

नेहमीच्या वळणानेच जाणारी कथा असूनही 'टॉवर हाऊस'ची हाताळणी दिग्दर्शक म्हणून एन. ए. अन्सारी यांनी कमालीच्या वेधकपणे केल्यामुळे अखेरपर्यंत तो उत्कंठावर्धक ठरला होता. विशेषतः शेवटच्या क्लायमॅक्सला नायक- खलनायकाची हाणामारी सुरू असताना चित्रपटाभर कुबडी घेऊन वावरणारा रणजीत आपलं खरं रूप प्रकट करतो आणि तो लंगडा नि एका डोळ्याने आंधळाही नाही हे प्रेक्षकांना कळतं तेव्हा नक्कीच चकित व्हायला होतं. अर्थात नायकापेक्षा खलनायकच उजवा ठरावा असं काम इथं अन्सारी करून गेला होता. नायकाच्या रूपातला अजित पाहणं जाचक ठरावं एवढं सुमार काम त्याने केलं होतं. मुळात 'टॉवर हाऊस'च्या वेळी नायक म्हणून त्याची कारकीर्द जवळजवळ संपुष्टात आलेली होती. तो इथं जेवढा प्रौढ वाटला तेवढीच शकिलाही. कारण तिचीही 'नायिका' रुपेरी पडद्यावर संपल्यासारखीच होती.

नायकाला साइडकिक असणं ही त्या काळातली फॅशनच होती, म्हणून इथं मास्टर भगवानची वर्णी लावण्यात आलेली. एका जमान्यात वसंतराव पहलवान आणि मास्टर भगवान या जोडीचे हाणामारीचे चित्रपट बघायला लोक झुंडीने जात. त्यामुळे इथं नायकाच्या मदतीसाठी गुंडांबरोबर मारामारी करणारा भगवान आपल्या नेहमीच्या स्टाईलमध्ये भाव खाऊन गेला होता.

परंतु 'टॉवर हाऊस' खऱ्या अर्थाने आठवणीत राहिला तो लताच्या 'ऐ मेरे दिले- नादाँ' या सोलो गीतामुळेच. वास्तविक पाहता हे दर्दभरं गाणं ऐकताना नायिकेने ते नायकाच्या विरहामुळे म्हटलं असावं असं वाटतं, पण तसं ते नव्हतंच. उलट आई- वडिलांचं छत्र हरपल्यामुळे एकाकी पडलेल्या नायिकेने त्या दुःखात हे गीत आळवलं होतं. ते अधिक परिणामकारक ठरण्याचं आणखी एक कारण म्हणजे चित्रपटात ते दोन-तीन वेळा वापरण्यात आलं होतं.

तीच गोष्ट 'मैं खुशनसीब हूँ' या गाण्याबाबतही म्हणता येईल. त्याचाही वापर संगीतकार रवीने असाच दोन- तीन वेळा केला होता. त्यामुळे 'टॉवर हाऊस'मधील ही दोनच गाणी प्रेक्षकांच्या चांगली लक्षात राहिली, पण काळाच्या ओघात कायमचं टिकलं ते लताचं 'ऐ मेरे दिले- नादाँ...' 'टॉवर हाऊस'सारखा सुमार चित्रपट तसा गाजलाही नव्हता. शिवाय नंतर तो फारसा कुठं बघायलाही मिळाला नाही. पण रेडिओवर मात्र त्यातलं हे गाणं अगदी अलीकडेही वाजवलं जातं आणि ते गाणारी थोराड शकिला डोळ्यांसमोर तरळू लागते.

■ विजय शिंगोर्णीकर